॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻
परिस्थितीच्या अधीन होऊ नका,
परिस्थितीवर मात करा.




■ अहमदनगर ■ रविवार, दि. ५ मे २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक ६४ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145



येणाऱ्या सर्वच निवडणुकांसाठी एकत्र
पान क्र. २ वर



जनतेसाठी केलेल्या कामाचे पाठबळ निश्चित मिळेल
पान क्र. ३ वर



'वोट जिहाद राजकारणा'ला जनता थारा देणार नाही
पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### देवेगौडापुत्र रेवण्णा पोलिसांच्या ताब्यात

● **बंगळुरू ।** कर्नाटकचे माजी मंत्री आणि जेडीएसचे आमदार एच. डी. रेवण्णा यांना शनिवारी पोलिसांनी ताब्यात घेतले. एका महिलेच्या अपहरणप्रकरणी ती कारवाई करण्यात आली. रेवण्णा हे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे पुत्र आहेत. ऐन निवडणूक काळात जेडीएसला अडचणीत आणणारे सेक्स स्कँडल प्रकरण चव्हाट्यावर आले आहे. त्या प्रकरणावरून जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवण्णा वादाच्या केंद्रस्थानी आले आहेत. त्या प्रकरणातील एका पीडितेचे अपहरण केल्याच्या आरोपावरून प्रज्वल यांचे वडील रेवण्णा यांच्या विरोधात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर रेवण्णा यांनी अटकपूर्व जामिनासाठी याचिका दाखल केली. ती स्थानिक न्यायालयाने फेटाळली. त्यानंतर कर्नाटक पोलिसांच्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) देवेगौडा यांच्या घरी जाऊन रेवण्णा यांना ताब्यात घेतले. दरम्यान, जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्यावर सेक्स स्कँडल प्रकरणात गंभीर आरोप झाल्यानंतर त्यांनी परदेशात पलायन केले. मात्र, खासदार प्रज्वल रेवण्णा हे भारतात येताच कोणत्याही क्षणी त्यांना अटक होणार असल्याची माहिती आहे. प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील आरोपाचा तपास करण्यासाठी कर्नाटक सरकारकडून विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

### दहशतवादी हल्ल्यात जवान शहीद

● **नवी दिल्ली ।** जम्मू-काश्मीरमध्ये शनिवारी दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांच्या २ वाहनांना लक्ष्य करून गोळीबार केला. त्या हल्ल्यात एक जवान शहीद झाला, तर ४ जवान जखमी झाले. ती घटना पूँच जिल्ह्यात घडली. लष्कराचा ट्रक आणि भारतीय हवाई दलाच्या (आयएएफ) वाहनावर दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार केला. या गोळीबारात जखमी झालेल्या जवानांपैकी दोघांना गंभीर दुखापत झाली.

# आळंदीवरुन परतताना भाविकांवर काळाचा घाला

## बस-कारच्या अपघातात पारगाव सुद्रिक येथील चार जण ठार तर तिघे गंभीर जखमी

● **श्रीगोंदा । वीरभूमी -**

श्रीगोंदा - शिरूर रस्त्यावरील ढवळगाव परिसरात श्रीगोंदा बसस्थानकाची बस व खाजगी कंपनीची कार यांच्यात समोरासमोर भीषण धडक होऊन श्रीगोंदा तालुक्यातील पारगाव सुद्रीक येथील एर्टिगा कार मधून प्रवास करणारे ४ जण जागीच ठार झाले तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची भीषण घटना शनिवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली. जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याबाबत सविस्तर मिळालेल्या माहिती नुसार, श्रीगोंदा डेपोमधील श्रीगोंदा-बेलवंडी शिरूर बस (क्रमांक एमएच. १४, बीटी. ०८७३) आणि मारुती कंपनीची एर्टिगा कार (क्रमांक एमएच. १२, टीवाय ४३५२) ही आळंदी येथून देवदर्शन करून पारगाव सुद्रीक (ता. श्रीगोंदा) येथे येत होती. तर श्रीगोंदा डेपोची गाडी शिरूरच्या दिशेने जात असताना दुपारी चार वाजण्याच्या सुमारास ढवळगाव परिसरातील कुकडी चारी क्रमांक ३४ च्या वळणावर समोरासमोर जोरदार धडक होऊन एर्टिगा कार मधील पारगाव सेवा संस्थेचे व्हा. चेअरमन विश्वनाथ लक्ष्मण ननवरे



(वय ५५), पारगाव सेवा संस्थेचे सदस्य हरी तुकाराम लडकत (वय ६०), ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब बापूराव मडके (वय ५५), दत्तात्रय बळीराम खेतमाळीस (वय ६०) हे चार जण जागीच ठार झाले तर कारमधील गंभीर जखमी झालेल्या तिघांपैकी चालक विठ्ठल गणपत ढोले (वय ३६, रा. लोणी व्यंकनाथ), रंगनाथ मुरलीधर खेतमाळीस (वय ७०) या दोन जणांना शिरूर येथील वेदांत हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले आहे तर रोहिदास सांगळे (वय ७२) यांना ढवळगाव येथील आनंदवन येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले आहे. जखमी तिघांची प्रकृती चिंताजनक असून त्यांचेवर उपचार सुरू आहेत.

### काळा आला होता पण वेळ आली नव्हती

■ एकादशी असल्याने पारगाव येथील आठ जण आळंदी येथे माऊलींच्या दर्शनासाठी गेलेले होते. दर्शन झाल्यानंतर गाडी मधील गोपीनाथ हिरवे हे मुलाला भेटण्यासाठी पुणे येथे जाणार असल्याने आळंदी येथेच उतरल्याने उर्वरित सात जण घराकडे येत असताना त्यांच्यावर काळाने घाला घातला. तर हिरवे यांचे नशीब बलवत्तर असल्याने त्यांच्या बाबतीमध्ये काळ आला होता पण वेळ आली नसल्याने माउलींनी त्यांना आळंदी येथे उतरून घेतले.

सदर घटनेची माहिती समजताच बेलवंडी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संतोष भंडारे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत जखमींना स्थानिक नागरिकांच्या मदतीने उपचारासाठी दवाखान्यात दाखल केले. घडलेल्या घटनेमुळे पारगाव सुद्रिक गावावर शोककळा पसरली आहे.

## कत्तलीसाठी आणलेल्या ५० जनावरांची सुटका

● **नगर । वीरभूमी -**

राज्यात बंदी असलेल्या गोवंशीय जनावरांची हत्या करून गोमांस वाहतूक व विक्री करार्णार्यांवर गोवंशीय ५० जनावरांची राहाता तालुक्यातील लोणी, ममदापूर परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून तब्बल १२ लाख ५५ हजारांचा मुद्देमालासाह ५ आरोपींना ताब्यात घेतले आहे. इरफान शेरखान पठाण (वय २४, अनिस नुरा पठाण (वय ३३, जावेद नाजु शेख (वय ३५, (तिन्ही रा. ममदापूर, ता. राहाता) असे ताब्यात घेतलेल्या आरोपींचे नावे आहेत. त्यांचेकडे अधिक चौकशी केली असता त्यांचे साथीदारांची नावे अदिल सादिक कुरेशी (फरार), नाजीम आयुब कुरेशी (फरार), वसीम हनीफ कुरेशी (फरार), ७) आरिफ अमीर कुरेशी (फरार) व शोएब बुडन कुरेशी (फरार) (सर्व रा. ममदापुर, ता. राहाता) असे सांगितले. आरोपींकडे कत्तल केलेल्या गोमांस व कत्तलीसाठी आनेलेली जनावरे बाबत विचारले असता ही जनावरे अल्ताफ जलाल शेख याचे घराचे लगत अलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये बांधलेले आहे. ही जनावरे सुरेश लक्ष्मण खरात व मुम्तजील मुनीर कुरेशी हे कत्तलीसाठी आणून देतात असल्याचे सांगितले. ५ आरोपींकडून ९ लाख ९० हजार रुपये किंमतीचे ३ हजार ३०० किलो गोमांस व २ लाख ५० हजार रुपये किंमतीची ५० गोवंशीय लहान जनावरे, १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल, असा एकुण १२ लाख ५५ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. याबाबत लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खर्च सादर न केलेल्या उमेदवारांना नोटिसा

● **नगर । वीरभूमी -**

लोकसभा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांचे निवडणूक खर्च सादर न केल्याल्या चार उमेदवारांना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी नोटीस बजावली आहे. तसेच त्यांना ४८ तासात खर्च सादर करावा, अन्यथा निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार लोकप्रतिनिधीत्व कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई केली जाइल, असे त्यांनी म्हटले आहे.

लोकसभेचा उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांनी त्यांची दैनंदिन खर्चाची नोंदवही संपूर्ण प्रचार कालावधीत किमान तीन वेळा खर्च निरीक्षकांसमोर सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांची निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी शुक्रवार (दि. ३) रोजी जिल्हाधिकारी कार्यालय येथे खर्च निरीक्षक शक्ती सिंग यांच्या उपस्थितीत पार पडली. या तपासणीस २५ उमेदवारांपैकी २१ उमेदवार व प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच उमाशंकर श्यामबाबू यादव, अमोल विलास पाचुंदकर, रावसाहेब शंकर काळे व दिलीप कोंडीबा खेडकर हे ४ उमेदवार अनुपस्थित असल्यामुळे त्यांना आयोग यांच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी यांच्याद्वारे नोटीस देण्यात आली आहे. निरीक्षक शक्ती सिंग यांनी स्वतः सर्व उमेदवारांच्या खर्चाच्या नोंदवहीची तपासणी केली. प्रथम तपासणीनंतर उमेदवारांच्या खर्चाचे दैनंदिन नोंदवही निवडणूक आयोग यांच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येणार आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर केंद्राकडून कांदा निर्यात बंदी मागे

## केंद्र सरकारचा शेतकऱ्यांसाठी महत्वाचा निर्णय । निर्यात सर्व देशासाठी खुली

● **नाशिक । वीरभूमी -**

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कवडीमोल भाव मिळत असल्यामुळे मागील अनेक दिवसांपासून कांद्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात चर्चेत येतोय. निर्यात बंदी त्यासोबतच कांद्याला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सरकार विरोधात प्रचंड रोष निर्माण झाला होता. लोकसभा निवडणुकीच्या काळात कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी मात्र भाजपच्या उमेदवारांना घेरण्याचा प्रयत्नही केला. मात्र आज केंद्र सरकारने सहा देशात कांदा निर्यात करण्याची परवानगी दिल्यानंतर आता संपूर्ण देशांसाठी कांदा निर्यात खुली करण्याचा निर्णय घेतला आहे.

निवडणुकीच्या काळातील केंद्र सरकारचा हा कांदा उत्पादकांसाठी सलग दुसरा मोठा निर्णय आहे, त्यामुळे आता कांदा उत्पादक शेतकऱ्यांची नाराजी दूर करण्यासाठी राज्यातील महायुतीचे नेते प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत होतं. आता या संदर्भात केंद्राने देखील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची नाराजी बघता मोठा निर्णय घेतला असल्याचं बोललं जात आहे. नाशिक मधील दिंडोरी लोकसभा मतदारसंघ हा शहरी आणि ग्रामीण मतदार संघ आहेत. दिंडोरी लोकसभा मतदारसंघात सर्वाधिक कांदा उत्पादक शेतकरी असून आशिया खंडातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ ही लासलगाव येथे दिंडोरी लोकसभा मतदारसंघात येते. मात्र, यंदा केंद्रीय राज्यमंत्री भारती पवारांना प्रचार करण्यासाठी कांदा उत्पादक शेतकरी अडचण निर्माण करत होते त्यामुळे सलग एक महिना उलटून देखील केंद्रीय राज्यमंत्री डॉक्टर भारती पवार या मतदारसंघात प्रचारासाठी फारशा दिसल्या नाही. त्यामुळे आता कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा रोष बघता या निर्णयामुळे केंद्रीय राज्यमंत्री डॉक्टर भारती पवारांनी शेतकऱ्यांची नाराजी दूर करण्यासाठी आपले प्रयत्न सुरू केले.

सर्व देशात कांदा निर्यात खुली केल्यानंतर आता तातडीने केंद्रीय राज्यमंत्री डॉक्टर भारती पवारांनी पत्रकार परिषद घेतली. निर्यात बंदी उठवल्यामुळे केंद्र सरकार तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देखील भारती पवारांनी आभार मानले. निर्यात खुली झाली असून हा निर्णय शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असल्याचं भारती बाबा यांनी म्हटले. राज्यातील महायुतीच्या सर्व नेत्यांनी कांद्यावरील निर्यात बंदी उठवावी यासाठी प्रयत्न केले असून केंद्राने अखेर हा निर्णय घेत शेतकऱ्यांना दिलासा दिला



असल्यास देखील केंद्रीय राज्यमंत्री डॉक्टर भारती पवार यांनी म्हटले. ५५० डॉलर मॅट्रिक टन कांद्याचे किमान मूल्य निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल आणि किमान मूल्याच्या आज कांदा खरेदी करता येणार नाही साधारणपणे कांद्याला प्रति किलो ४६ रुपये इतका भाव मिळणार आहे अशी माहिती देखील केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी दिली.

केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे आता केंद्रीय राज्यमंत्री डॉक्टर भारती पवार यांनी दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मनधरणी सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे आता कांद्यावरील निर्यात बंदी उठवल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारने निवडणुकीच्या तोंडावर सलग दुसरा कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेतल्यामुळे आता या निर्णयाने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रयत्न असल्यास देखील विरुद्धकांकडून बोललं जात आहे. त्यामुळे आता कांद्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निवडणुकीच्या तोंडावर पेटणार अशी परिस्थिती आता निर्माण झाली असल्याचं पहायला मिळत आहे. सध्या कांद्याच्या निर्यातीवर बंदी आहे. परंतु केंद्र सरकारने भारताच्या काही मित्र राष्ट्रांना कांदा पाठवण्याची परवानगी दिली होती. आता निर्यातबंदी उठवली आहे. यामुळे कुठे कांदा निर्यात करता येणार आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये भारताने ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लागू केले होते. कांदा निर्यातबंदीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यावधीचे नुकसान झाले. आता चार महिने २७ दिवसानंतर कांद्यावरील निर्यातबंदी हटवली आहे. आता ४० टक्के ड्युटी व ५५० डॉलर प्रति मेट्रिक टन शुल्क देत करता येईल विदेशात व्यापाऱ्यांना कांदा निर्यात करता येणार आहे. या निर्णयामुळे मिळणार महायुतीच्या उमेदवार केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ भारती पवार यांना दिलासा मिळणार आहे. केंद्र सरकारने मागील वर्षी राजस्थान, मध्यप्रदेश, तेलंगाना, छत्तीसगड आणि मिझोरम राज्यांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून कांदा निर्यात बंदी केली होती. त्यानंतर ही बंदी मार्च २०२४ पर्यंत वाढवली होती. त्यानंतर पुन्हा ही बंदी वाढवली. देशातील बाजारपेठेत कांद्याचे दर वाढले होते. यामुळे ग्राहक नाराज होईल. यामुळे कांदा निर्यात बंदी करण्यात आली.

SPOT NEWS

## आनंदी जीवनासाठी आज प्रेरणादायी मार्गदर्शन व्याख्यान

● **नगर । वीरभूमी** –
यशाचा उत्तम मार्ग म्हणजे पुन्हा एकदा प्रयत्न करणे होय, यासाठी आपण नेहमी प्रयत्नशील असतो, आपल्या जीवनात अनेक ध्येय असतात, ते डोळ्यासमोर ठेवून आपल्या सुखी आयुष्याची अनेक स्वप्न पाहत असतो, यासाठी तुमच्या जीवनात सुखी व समृद्ध करण्यासाठी मार्गदर्शकाची खूप गरज असते. तुम्ही युवक असाल तर आपले यशस्वी जीवनासाठी अनेक प्लॅनिंग नियोजन करीत असतो, कौटुंबिक जीवनात आनंदी आहात, तसेच यशस्वी उद्योजक आहात, ही गोष्ट आपल्या आयुष्यासाठी खूप महत्त्वाचे आहे त्यासाठी तुम्हाला प्रेरणा देण्याची गरज आहे. कारण जर तुम्हाला आयुष्यात पुढे जाण्यासाठी प्रेरणा मिळाली नाही तर तुम्ही निराश होता जीवन संघर्षमय वाटायला लागते. निराश न होण्यासाठी कायम प्रेरणा मिळणे आपल्याला आवश्यक आहे. याच उद्देशाने रविवार दिनांक ५ मे रोजी सायंकाळी ७ वाजता अहमदनगर येथील पाईपलाईन रोड, गावडे मळा, ध्यान केंद्र हॉलमध्ये आनंदी जीवनासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे. यामध्ये मार्गदर्शन आंतरराष्ट्रीय युवा ट्रेनर, बिजनेस कोच पार्टनर, स्पिरीच्युअल आणि लाइफ कोच पार्टनर असे अनेक यशस्वी सेमिनार करणारे श्री सलीलजी पुळेकर करणार आहेत. यांचे देशभरात नव्हे तर विदेशामध्ये देखील आयोजित झालेले आहेत. प्रेरणादायी मार्गदर्शनासाठी जास्तीत जास्त नगरवासीयांनी या शिबिरामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कृष्णा पेंडम यांनी केले आहे.

## मराठी पाउल पडते पुढे’ या मराठमोळ्या मैफलीचे आयोजन

● **नगर । वीरभूमी** –
महाराष्ट्र दिनानिमित्त नगरच्या सामाजिक व प्रबोधनात्मक क्षेत्रात काम करणाऱ्या विचार भारती व चैतन्य फाउंडेशनच्या वतीने शनिवार दि. ४ मे रोजी मराठी पाउल पडते पुढे’ या मराठमोळ्या गीतांच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडी येथील माउली सभागृहात सायंकाळी ६ वाजता ही मराठी गाण्यांची मैफल होणार असल्याची माहिती विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी यांनी दिली. विचार भारतीतर्फे शहरातील सज्जन शक्तीच्या एकत्रीकरणासाठी गेल्या वर्षापासून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात येत आहे. याआधी गीतरामायण, रागदारीवर हिंदी गाण्यांची मैफलीचे आयोजनानंतर उद्या महाराष्ट्र दिनानिमित्त मराठी पाउल पडते’ पुढे या मराठमोळ्या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. आरोही निर्मत व अविनाश कुलकर्णी प्रोडक्शन प्रस्तुत या मैफलीत धवल चांदवडकर, स्वप्ना लेले, चैतन्य कुलकर्णी, रश्मी मोघे व केतकी कुलकर्णी हे प्रसिद्ध गायक मराठी गीते सादर करणार आहेत. या मैफलीसाठी सशुल्क राखीव प्रवेश आहे. माउली सभागृह येथे कार्यक्रमाच्या अगोदर सशुल्क प्रवेशिका मिळणार आहेत, असे चैतन्य फाउंडेशनचे अनंत देसाई यांनी सांगितले.

# येणाऱ्या सर्वच निवडणुकांसाठी एकत्र

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. राम शिंदेची ग्वाही! । जामखेड मध्ये महायुतीची प्रचार सभा

● **जामखेड । वीरभूमी** –
माझ्या आणि आ. राम शिंदे यांच्या मध्ये आता कोणतेही मतभेद राहीलेले नसुन यापुढील सर्व निवडणूका आम्ही एकत्रित येवून एक विचाराने लढविणार आहोत, अशी ग्वाही राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील व माजी मंत्री आ. प्रा. राम शिंदे यांनी आज जामखेड शहरातील चुंभळी येथील जाहीर सभेत दिली.

लोकसभा निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने शहरातील जामवाडी, तपनेश्वर, मुख्य बाजारपेठ, शिवाजी नगर, संताजी नगर, सदाफुले वस्ती, आरोळे वस्ती आणि चुंभळी येथे नागरीकांच्या भेटी घेवून संवाद साधला. केंद्र आणि राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहीती देवून महायुतीच्या उमेदवाराला खंबीरपणे साथ देण्याचे आवाहन त्यांनी केले. माजी मंत्री आ.राम शिंदे, शिवसेना नेते बाबुशेठ टायरवाले, भाजपा नेते



विनायकराव देशमुख यांच्यासह स्थानिक पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

चुंभळी येथील कार्यक्रम सुरु होताच, उपस्थितांनी आ.राम शिंदे यांच्यावर होत असलेल्या अन्यायाचा प्रश्न उपस्थित केला. आ. शिंदे यांनीच या चर्चेत हस्तक्षेप करुन, मंत्री विखे पाटील आणि माझ्यामध्ये आता कोणतेही मतभेद राहीलेले नाहीत. आपल्याला आता महायुतीच्याच उमेदवाराचे काम करायचे आहे. या भागातून शंभर टक्के मतदान हे महायुतीच्या उमेदवारालाच होईल, असे काम करायचे आहे, असे सांगून त्यांनी हा विषय संपविला.

याच विषयाचा उल्लेख करुन, मंत्री ना. विखे पाटील यांनीही चुंभळी येथील श्री. म्हसोबा महाराजांच्या देवस्थानाचा उल्लेख करुन, आमच्या लोणी बुद्रूक गावाचे ग्रामदैवत सुध्दा म्हसोबा महाराज आहेत. या देवस्थानांच्या साक्षीने सांगतो की, आमच्या दोघांमध्ये आता कोणतेही मतभेद नाहीत. यापुढील सर्व निवडणूका आम्ही एकत्रितपणेच लढविणार आहोत. याबाबत कुणीही मनात संभ्रम ठेवू नये.

## मसापचे युवा नाट्य व साहित्य संमेलन नगरला होणार

● **नगर । वीरभूमी** –
महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने या वर्षी होणारे साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठित समजले जाणारे राज्यस्तरीय युवा साहित्य आणि नाट्य संमेलन आयोजीत करण्याचा मान अहमदनगरला मिळाला असून पुणे येथे नुकत्याच झालेल्या म सा प चे कार्याध्यक्ष श्री मिलिंद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये हा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर यांनी दिली.

बैठकीचे अध्यक्ष मिलिंद जोशी म्हणाले की, यावर्षीचे हे संमेलन भरविण्याचा मान नगरला सर्वानुमते मिळाला असून यापूर्वी देखील म.सा.प च्या सावेडी उपनगर शाखेने स्वागताध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या नेतृत्वाखाली विभागीय साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते. आदर्श, उत्कृष्ठ नियोजन अन् कायम लक्षात राहिल अशा यशस्वी संमेलनाचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला होता.

संमेलनाच्या निमंत्रकपदी सर्वानुमते येलुलकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी म. सा. प च्या प्रमूख कार्यवाह सूनिताराजे पवार, कोषाध्यक्ष श्री.विनोद कुलकर्णी यांनी आपले विचार मांडले व शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ज्येष्ठ पदाधिकारी ॲड. प्रमोद आडकर, राजन लाखे, प्राचार्य तानसेन जगताप, रवींद्र बेडकिहाळ आदी उपस्थित होते.

## महाराष्ट्र ही संतांची, शूरवीरांची, क्रांतीकारकांची भूमी : प्राचार्य अरुण वावरे

● **शेवगाव । वीरभूमी** –
विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक सक्षम व्हावे तसेच आपला विकास करावा. महाराष्ट्राची वेगळी छबी या देशात आहे. इतर राज्यापैकी महाराष्ट्राची संस्कृती वेगळी आहे. महाराष्ट्र ही संतांची, शूरवीरांची, क्रांतीकारकांची भूमी आहे, असे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य अरुण वावरे यांनी केले.



शेवगाव तालुक्यातील चापडगाव माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन कार्यक्रम संपन्न झाला. प्रसंगी अध्यक्षस्थानाहून ते बोलत होते. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे, ज्येष्ठ शिक्षिका मंदाकिनी खंडागळे, आप्पासाहेब ढगे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य वावरे पुढे म्हणाले की महाराष्ट्र हा प्रतिभारत मानला जातो. विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासात सातत्य ठेवून स्वतःची प्रगती करावी. कार्यक्रम प्रसंगी विद्यालयातील शिक्षिका तेजस्विनी पावसे, मंदाकिनी खंडागळे, तरन्नूम शेख, हर्षल भाकरे, जयश्री शिंदे, काजल कोल्हे शिक्षिकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे तर आभार प्राध्यापक दादासाहेब ज्योतीक यांनी केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंदाचे सहकार्य लाभले.

### जय जय शनिदेव मालिकेच्या कलाकारांनी

# शनी शिंगणापूर येथे घेतले शनिदेवाचे दर्शन

### ‘जय जय शनिदेव’ ८ मे पासून रात्री ९.३० वाजता आपल्या सोनी मराठी वाहिनीवर!

● **नगर । वीरभूमी** –
सोनी मराठी वाहिनी प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी नेहमी नवनवीन कार्यक्रम घेऊन येत असते. आजवर पौराणिक, ऐतिहासिक, थरारक, इत्यादी मालिका सोनी मराठी वाहिनीवर पाहायला मिळाल्या आहेत. त्यातच आता सोनी मराठी वाहिनीने नवी मालिका घोषित केली आहे. ’जय जय शनिदेव’ असे या मालिकेचे नाव आहे. जीवनात सुख, शांतता आणि समाधान देणारी न्यायाची देवता ’शनिदेव’ यांच्यावर आधारित ही नवी मालिका असणार आहे. मालिकेच्या प्रदर्शनापूर्वी मालिकेच्या कलाकारांनी आणि निर्मात्यांनी शनी शिंगणापूर येथे जाऊन दर्शन घेतले. निर्माते आणि लेखक संतोष अयाचित आणि शनिदेवांच्या भूमिकेत असलेले संकेत खेडकर हे सहभागी झाले. यांनी शनी शिंगणापूर येथे दर्शन घेतले आणि मालिकेनिमित्त छोटेसे हवन देखील केले. त्या नंतर कलाकारांच्या हस्ते महाआरती देखील करण्यात आली. या वेळी श्री शनेश्वर देवस्थान शनि शिंगणापूर यांचा मोठा हातभार लाभला. त्याशिवाय अध्यक्ष भागवत सोपान बानकर, उपाध्यक्ष विकास नानासाहेब बानकर, सरचिटणीस बाळासाहेब बोर्डे, चिटणीस आबासाहेब शेटे मा. आ. शंकरराव गडाख, नितीन शेटे हे देखील उपस्थित होते. यांचे मालिकेच्या टीमने विशेष आभार व्यक्त केले.

अभिनेता संकेत खेडकर हा शनिदेवांची भूमिका साकारतो आहे. याआधी विविध मालिकांमधून काही भूमिका त्याने साकारल्या आहेत. पण प्रमुख भूमिका म्हणून ’शनिदेव’ ही संकेतची पहिलीच भूमिका आहे. विशेष म्हणजे संकेत हा मूळचा अहमदनगरचा असून ‘जय जय शनिदेव’ मालिकेत शनिदेवांची भूमिका साकारणं हे त्याचं भाग्यच म्हणावं लागेल. काही दिवसांपूर्वी ’जय जय शनिदेव’ मालिकेची पहिली झलक प्रेक्षकांना पाहायला मिळाली. शनिदेवांची भूमिका कोण साकारणार आणि त्यांची वेशभूषा कशी असेल याची चर्चा तेव्हापासूनच रंगली होती. पण आता शनिदेवांची वेशभूषा प्रेक्षकांसमोर आली आहे. त्यावर मिळणारा प्रतिसाद आणि प्रेक्षकांचे प्रेम पाहून शनिदेव हा विषय प्रेक्षकांच्या किती जवळचा आहे, हे कळतं आहे.

शनिदेव यांच्यावर आधारित मालिका प्रेक्षकांना पाहता येणार आहे. सोनी मराठी वाहिनीने पहिलं पाऊल उचललं आहे. प्रेक्षकांची आतुरता आता शिगेला पोहोचली आहे. शनिदेव ही न्यायाची देवता आपल्या भक्तांच्या जीवनात सुख, शांतता आणि समाधान मिळवून देण्यासाठी मदत करते. शनिदेवांचा हा इतिहास अजून कोणीही प्रेक्षकांसमोर आणलेला नाही. सूर्यपुत्र, न्यायदाते, आणि अवघ्या जगाचे कर्मदाते शनिदेव यांची महागाथा ८ मेपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पहिल्याच दिवशी १ तासाचा विशेष भाग प्रेक्षकांना पाहता येणार आहे. शनिदेवांचे निरनिराळे अध्याय या मालिकेतून प्रेक्षकांसमोर मांडले जातील. विक्रमादित्य यांची गोष्ट आपल्याला मालिकेच्या सुरुवातीच्या भागांत पाहायला मिळणार आहे. शनिदेवांच्या भूमिकेत अभिनेता संकेत खेडकर दिसणार आहे तर महादेवांच्या भूमिकेत अभिनेता त्रिशुल मराठे आपले पदार्पण करत आहे. संतोष अयाचित यांच्या लेखणीच्या पेटार्यातून आणखीन एक मालिका प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. त्यांच्या लेखणीतून ’जय जय शनिदेव’ मालिकेचे लेखन होणार आहे. संतोष अयाचित हे मालिकेचे निर्मातिदेखील आहेत.

जीवनात सुख, शांतता आणि समाधान देणारी न्यायाची देवता ’शनिदेव’ यांचा जीवनप्रवास या मालिकेतून ८ मे पासून सोनी मराठी वाहिनीवर उलगडणार आहे. संकेत




खेडकर हा अभिनेता शनिदेवाची भूमिका कशा प्रकारे साकारतो, ते आपल्याला पाहायला मिळेल. त्यामुळे पाहायला विसरू नका, ’जय जय शनिदेव’, ८ मे पासून रात्री ९.३० वाजता सोनी मराठी वाहिनीवर.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## निवडणूक कर्तव्यावर असलेल्या मतदारांसाठी मतदार सुलभता केंद्र

**नगर | वीरभूमी –**
भारत निवडणूक आयोगाने मतदानाच्या दिवशी निवडणूक कर्तव्यावर कार्यरत असलेल्या मतदारांना मतदान करण्यासाठी प्रशिक्षणाच्या ठिकाणी मतदार सुलभता केंद्र स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार ३७-अहमदनगर लोकसभा मतदार संघातील २२२-शेवगाव, २२३-राहुरी, २२४-पारनेर २२५- अहमदनगर शहर, २२६- श्रीगोंदा व २२७-कर्जतजामखेड या सहा विधानसभा मतदार संघात मतदार सुलभता केंद्रांची व्यवस्था प्रशिक्षणाच्या ठिकाणी करण्यात येत आहे. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या मतदारांनी त्यांच्या प्रशिक्षणाच्या दिवशी टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाचा हक्क मतदार सुलभता केंद्रावर जाऊन बजवावा. असे आवाहन ३७-अहमदनगर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केले आहे.

## निमगाव वाघात बिरोबा महाराज यात्रोत्सवानिमित्त कावडीची मिरवणूक

**नगर | वीरभूमी –**
निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त मागील वीस वर्षापासून कावडीने गंगाजल आणणाऱ्या युवकांचा वीरभद्र बिरोबा देवस्थान, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त गावातील युवक अनेक वर्षापासून कावडीने गंजाजल आनत आहे. नुकतेच गावातील युवकांनी कावडीने गंगाजले आणले. यावेळी गावातून मोठ्या उत्साहात कावडीची डफ, ढोल, ताशे व लेझीम पथकासह मिरवणूक काढण्यात आली. तर श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा करण्यात आली. वीस वर्षापासून कावडीने गंगाजल आणणारे विजय जाधव, अंबादास निकम, राजू भुसारे, दत्तात्रय शिंदे, सचिन उधार, ज्ञानदेव जाधव, भाऊ साळवे आदींचा देवाचे भगत नामदेव भुसारे व डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बाळू भुसारे, बाबा जाधव, पांडुरंग गुंजाळ, बाबा पुंड, संजय डोंगरे, रामदास वाखारे, रावसाहेब भुसारे, युवराज भुसारे आदी उपस्थित होते. बिरोबा मंदिरात पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गावात रात्री रेखा सविता नगरकर यांचा लोकनाट्य तमाशा मंडळाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. तर छबीना मिरवणुकीत ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युवकांनी केलेल्या फटाक्यांच्या आतषबाजीत आसमंत उजळून निघाला. यावेळी उद्योजक अरुण फलके, किरण जाधव, संदीप डोंगरे, अरुण कापसे, अनिल डोंगरे, वैभव फलके आदी उपस्थित होते.

## सत्यसाई सेवा समितीच्यावतीने ६ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम

**नगर | वीरभूमी –**
श्री सत्यसाई सेवा समिती अहमदनगर शाखेच्या बालविकास विभागातर्फे सोमवार दि. ६ मे २०२४ रोजी सायं. ५ वा. माऊली सभागृह, झोपडी कॅन्टीन, सावेडी रोड, अहमदनगर येथे भगवान बाबांच्या मातोश्री ईश्वराम्मा यांच्या पुण्यस्मरणानिमित्त श्री सत्यसाई बालविकास वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थ्यांनींचा विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला आहे.

# जनतेसाठी केलेल्या कामाचे पाठबळ निश्चित मिळेल

### खा. डॉ. सुजय विखे पाटील यांचा विश्वास | पाथर्डी तालुक्यातील विविध गावांत महायुतीची संवाद सभा

**पाथर्डी | वीरभूमी –**
मागील पाच वर्षाच्या काळात जिल्ह्यातील विविध प्रश्न सोडविण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. विविध मंत्रालयाच्या माध्यमातून निधीची उपलब्धता करून विकासकामांना गती दिली. अडीच वर्षाचा कोव्हीड कालावधी सोडला तर मतदार संघातील प्रत्येक माणसाच्या हितासाठी आपण काम करीत राहीलो. जनतेसाठी केलेल्या कामाचे पाठबळ निश्चित मिळेल असा विश्वास महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला. पाथर्डी तालुक्याच्या दौऱ्यातील संवाद सभेत बोलत होते.



महायुतीचे उमेदवार खासदार सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ पाथर्डी तालुक्यात ठिकठिकाणी संवाद सभांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खासदार डॉ. विखे यांच्यासह जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले, आमदार मोनिकाताई राजळे, दिनकरराव पालवे, एकनाथ आटकर, विजय गवळी, साहेबराव गोळे, महादेव कुटे, तसेच भाजपाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुजय विखे पाटील म्हणाले की, मागील पाच वर्षात मी जिल्ह्यातील विविध प्रश्नांची उकल केली असून रस्ते, पाणी, उद्योग विकास, पर्यटन, महिला सक्षमीकरण, शेतकऱ्यांचे, कामगारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र तथा राज्य शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत. जिल्ह्यातील गावागावात विकासकामांसाठी निधीची पुर्तता केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या विविध लोककल्याणकारी योजना जिल्ह्यातील प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहचविल्या आहेत. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार निर्मितीसाठी काम केले आहे.मला जिल्ह्याच्या विकासासाठी काय करावे लागणार याची जाण आहे.

येणाऱ्या काळात जिल्ह्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे, तरूणांच्या हाताला काम देणे, शिक्षणसाठी सुविधा उभ्या करणे, अत्याधुनिक आरोग्य सुविधा निर्माण, पाण्याचा प्रश्न मार्गी लावणे अशी विविध कामे करण्याचा आपला मानस त्यांनी व्यक्त केला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर आपला गाढा विश्वास असून नगरकरांच्या हितासाठी त्यांच्या माध्यमातून विविध विकासकामे केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवाजीराव कर्डीले यांनी सुद्धा यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित केले. त्यांनी खासदार यांच्या कार्याचा गौरव करत, वांभोरी चाळीतील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या कामाचा उल्लेख केला. तसेच येणाऱ्या काळात खासदार सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नाने वांभोरी चाळीच्या पाईपलाइनच्या नुतनिकरणाचा प्रश्न मार्गी लावला जाईल असे त्यांनी सांगितले.

तर आमदार मोनिकाताई राजळे यांनी मतदारांना आवाहन करताना सांगितले की, डॉ. सुजय विखे पाटील यांनी मागील पाच वर्षात दिलेल्या कामांची आश्वासने पुर्ण केली आहेत. त्यांनी दिलेला शब्द पाळला असून येणाऱ्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून जिल्ह्याचे प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. सुजय विखे पाटील हे सत्तेत असणे आवश्यक आहेत. यामुळे येत्या १३ मे ला नगर जिल्ह्यातील एक सुशिक्षित आणि सामान्य नागरिकांची कळकळ असलेला खासदार आपल्याला पाठवायचा आहे. यामुळे कमळाचे बटन दाबून त्यांना भरगोस मतांनी विजयी करा असे त्यांनी सांगितले.

## जिल्ह्यातील पतसंस्थांची विचार मंथन बैठक उत्साहात

**नगर | वीरभूमी –**
जिल्ह्यामध्ये संपदा व इतर पतसंस्थामध्ये जे घडले त्यामुळे पतसंस्था चळवळीत संभ्रमावस्था झाली होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, नाशिक विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर जिल्हा सहकारी स्थैर्यनिधी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील पतसंस्थाचे चेअरमन, मॅनेजर, संचालक यांची पतसंस्था चालविताना घ्यावयाची दक्षता यावर विचार मंथन बैठक, मेळावा नुकताच संपन्न झाला. त्यास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या मेळाव्यात नगर जिल्हयातील सर्व पतसंस्थांना आर्थिक पायावर भक्कम उभे करून सहकारी पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन अहमदनगर जिल्हा सहकारी स्थैर्यनिधी संघ संयुक्तपणे प्रयत्न करीत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाच्या तथा काका कोयटे यांनी दिली. या विचार मंथन बैठक मेळाव्यात बैठकीचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, निमंत्रक सुरेशजी वाबळे, उपाध्यक्ष वसंत लोढा, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक वासुदेवजी काळे व मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे, सहा निबंधक हर्षद तावरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी पतसंस्थांचे ऑडिटर, कर्मचारी वर्ग, संचालकांची बेफिकिरी, कधी तपासणी करत नाही, सोने तारण आदी विषयवार चर्चा करण्यात आली, येथून पुढे कोणतीही पतसंस्था अडचणीत येऊ नये यासाठी प्रयत्न करणार आहे.

## चौकस वृत्ती व कार्याचे नियोजन यामुळे प्राचार्य भास्कर झावरे यशस्वी : कुलगुरू डॉ. गोसावी

**नगर | वीरभूमी –**
चौकसवृत्ती, जिज्ञासा आणि कामाचे नियोजन यामुळे प्राचार्य भास्कर झावरे जीवनात यशस्वी झाले. शांत स्वभाव, सारासार विचार करून निर्णय घेण्याची क्षमता हे त्यांचे गुण वाखाणण्यासारखे असून महाविद्यालयाने केलेली प्रगती हे त्यांच्या दूरदृष्टीचे द्योतक आहे, असे उद्गार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी काढले.

येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजने प्राचार्य डॉ. भास्कर झावरे यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे होते. प्रास्ताविक व ओळख डॉ. बाळासाहेब सागडे यांनी करून दिली.

यावेळी प्राचार्य बी. एच. झावरे यांनी आपले मनोगतात म्हणाले, महाविद्यालयाचे कामकाज करताना पंधरा वर्षामध्ये आलेले चांगले-वाईट अनुभव त्यांनी यावेळी सांगितले. कधी शांतपणे तर कधी कठोर निर्णय घेत महाविद्यालयाला शिस्त लावली. या पंधरा वर्षाच्या कार्यकाळामध्ये महाविद्यालयाने दोनदा नॅक मानांकने मिळवून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवला. महाविद्यालयाने दोनदा पुरुषोत्तम करंडक जिंकला. शहरी भागातील उत्कृष्ट महाविद्यालय असा बहुमान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिला, याचा अभिमान असल्याचे असे सांगितले.

यावेळी संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, विश्वस्त नंदकुमार झावरे, जी. डी. खानदेशे, माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, प्रा. वराट, रवी वर्पे आदी व्यक्तींनी आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विवेक भापकर, खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे, विश्वस्त सीताराम खिलारी, मुकेश मुळे, अरुणाताई काळे, वसंत कापरे, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, माजी प्राचार्य शिवाजीराव देवढे, प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर, प्राचार्य डॉ. सहदेव आहेर, प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर, प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, उपप्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, डॉ. संजय कळमकर, डॉ. दिलीप ठुबे, प्रबंधक बबन साबळे, प्राध्यापक, कर्मचारी व अहमदनगर जिल्ह्यातील अनेक मान्यवर मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पंखात बळ निर्माण करण्याचे काम रात्रशाळा करते

### डॉ. पारस कोठारी | भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शिक्षणदूत अभियानाचा प्रारंभ

**नगर | वीरभूमी –**
परिस्थितीमुळे शिक्षण अर्धवट सोडून शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेच्या माध्यमातून पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हिंद सेवा मंडळ संस्थेच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलने शिक्षणदूत अभियानाचे प्रारंभ करण्यात आले. रात्र शाळेतील विद्यार्थी शिक्षणदूत म्हणून समाजात शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्याचे काम करण्याची ही संकल्पना आहे.

या अभियानाचा प्रारंभ रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या उपस्थितीमध्ये झाला. यावेळी प्राचार्य सुनील सुसरे, शिक्षक महादेव राऊत, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, बाळू गोरडे, कैलास करांडे, अनिरुध्द देशमुख, अनिरुध्द कुलकर्णी, अविनाश गवळी, कैलास बालटे, महिला शिक्षिका वैशाली दुराफे, वृषाली साताळकर आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



डॉ. पारस कोठारी म्हणाले की, भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये गेल्या ७२ वर्षापासून शिक्षणात खंड झालेल्या, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या शाळाबाह्य, आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी प्रवेशित होऊन आपला शैक्षणिक स्तर उंचावलेला आहे. अनेक विद्यार्थी रात्र शाळेत शिक्षण घेऊन सक्षमपणे रोजगार करत असून, त्यांनी आपली प्रगती साधली आहे. दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या पंखात शिक्षणाने बळ निर्माण करण्याचे काम ही रात्रशाळा करत आहे. आजही अनेक शाळाबाह्य विद्यार्थ्यांना रात्र शाळा ही संकल्पना माहित नाही. अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. रात्र शाळेतील ५५ विद्यार्थ्यांनी शिक्षणदूत होण्यासाठी पुढाकार घेतला असून, हे विद्यार्थी त्यांच्या भागातील शिक्षण अर्धवट सोडलेल्या विद्यार्थ्यांना रात्र शाळेत आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत.

भाई सथ्था नाईट हायस्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता आठवी ते बारावी ५०४ विद्यार्थी (विद्यार्थी २६४ व विद्यार्थिनी/महिला २४०) प्रवेशित झाले आहेत. दिवसा अर्थार्जन रात्री ज्ञानार्जन करण्याची संधी शहरातील सर्व गरजवंतांना उपलब्ध होत आहे. सोबतच मासूम संस्थेच्या (मुंबई) वतीने रात्र शाळेत प्रवेशित होऊन शैक्षणिकस्तर उंचावणाऱ्या गरजवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणासाठी (शिष्यवृत्ती)आर्थिक मदत देण्यात येते. आज अखेर मासूम संस्थेच्या वतीने फॅशन डिझायनिंगसाठी १२ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४८ हजार रुपये) डीएमएलटी साठी ०३ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ५४ हजार रुपये) ब्युटी पार्लर साठी ०२ विद्यार्थी (शिष्यवृत्ती प्रत्येकी ४५ हजार रुपये) या व्यतिरिक्त इतर व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी (शिष्यवृत्तीस) आर्थिक मदतीस पात्र झालेले असल्याची माहिती प्राचार्य सुनील सुसरे यांनी दिली.

भाई सथ्था नाईट हायस्कूल मध्ये शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण देखील दिले जात असून, यासाठी जन शिक्षण संस्था, सिद्धी प्यारा मेडिकल, इंडियन अकॅडमी ऑफ फॅशन डिझायनिंग, ट्राय लॉजिक सॉफ्ट सोल्युशन, ऐ. पी. प्रा. लि. (एमआयडीसी), ग्लोबल रिच स्किल ट्रेनिंग इंडिया प्रा.लि हे रात्र शाळेशी जोडल्या गेल्या आहेत.

शिक्षणापासून दुरावलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य करणारे शरद पवार, मंगेश भुते, पी.एच. शिंदे, ए.सी. ओमकार भिंगारदिवे, महिला शिक्षिका स्वाती होले मॅडम, विद्यार्थी शुभम पाचरणे यांना डॉ. कोठारी व शालेय समितीचे सदस्य विलास बडवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एस. शिंदे व गाडगीळ यांनी केले. या उपक्रमास शिक्षण विभाग व संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, जेष्ठ मार्गदर्शक अजितशेठ बोरा व सर्व संचालक मंडळाने शुभेच्छा दिल्या.

# ‘वोट जिहाद राजकारणा’ला जनता थारा देणार नाही

## भाजपाचे महाराष्ट्र प्रभारी खा. दिनेशकुमार शर्मा यांची नगरमध्ये पत्रकार परिषद

**● नगर । वीरभूमी –**

मतांच्या तुष्टीकरणासाठी फतवे काढून कुणी राजकारण करणार असेल तर त्याला जनता थारा देणार नाही. जनता ‘वोट जिहादचे राजकारण’ झुगारून देऊन मतांची क्रांती करून राष्ट्रवादाला पाठबळ देईल, असा विश्वास उत्तरप्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे प्रभारी खासदार डॉ. दिनेशकुमार शर्मा यांनी व्यक्त केला.

खासदार दिनेश शर्मा यांनी नगर दक्षिण आणि शिर्डी लोकसभा मतदार संघाचा दोन दिवस दौरा केला. संघटनात्मक पातळीवर पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा वॉरियर्स यांच्याशी संवाद साधून निवडणुकीतील बारकावे त्यांनी जाणून घेतले. नगरमध्येही युवा वॉरियर्स या मेळाव्यात त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

माध्यमांशी बोलताना डॉ. शर्मा म्हणाले की, राज्यात महायुतीला मोठे यश मिळणार असून २०१९ च्या विधानसभेत राज्यातील जनतेने दिलेल्या जनादेशाचा अवमान करणाऱ्यांना चांगलाच धडा शिकवेल. विरोधकांमध्ये आता कोणताही आत्मविश्वास राहिला नाही. विरोधी आघाडीतील प्रत्येक पक्षाला आपल्या अस्तित्वासाठी झगडण्याची वेळ आली आहे. पराभव समोर दिसू लागल्याने फतवे काढून राजकारण करण्याची वेळ त्यांच्यावर आली असल्याची जोरदार टिका शर्मा यांनी केली.

फतवे काढून वोट जिहादचे राजकारण करणे हे जनतेला मान्य नाही. समाजात सांप्रदायिकता रहावी हीच भाजपाची भूमिका आहे. विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक योजनांचा लाभ समाजातील सर्व घटकांना मिळवून देताना कधीही धर्माचा विचार करून भेद निर्माण होऊ दिला नाही. समाजातील प्रत्येक घटकांची उन्नती हाच योजना सुरू करण्यामागचा विचार आहे. पण केवळ आता मताच्या तुष्टीकरणासाठी फतवे काढले जात असतील तर सुज्ञ मतदार अशा राजकारणाला कधीही साथ देणार नाहीत. जनता राष्ट्रवादाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील. वोट जिहादच्या राजकारणाला मतांची क्रांती करून उत्तर देईल, असा इशारा त्यांनी दिला. उद्धव ठाकरे यांनी हिंदूत्वाचा विचार केव्हाच सोडून दिला आहे. त्यामुळे राज्यात सुरू झालेल्या फतव्यांच्या राजकारणाला विरोध करण्याची त्यांची हिम्मत नसल्याचा टोला डॉ. शर्मा यांनी लगावला.



राहुल गांधी यांनी मतदार संघ बदलावर बोलताना डॉ. शर्मा म्हणाले की, डरो मत असे बोलत होते. प्रियंका गांधी ‘मै लढती हू लढती रहुंगी’ असे देशभर सांगत होत्या मात्र निवडणुकीत त्यांची भूमिका ही केवळ राजकीय पर्यटनाची असून निवडणुका झाल्या की त्या लगेच रोम आणि इटलीत दिसतील अशी खोचक प्रतिक्रियाही त्यांनी व्यक्त केली.

डॉ. दिनेश शर्मा यांनी सकाळी नगरमध्ये आल्यानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमवेत चर्चा केली. या प्रसंगी आमदार मोनिका राजळे तसेच प्रदेशातून आलेले पदाधिकारी उपस्थित होते. उभयनेत्यांमध्ये मतदार संघातील निवडणुकीच्या प्रचाराबाबत सखोल चर्चा झाली.

# संविधानाचा सन्मान राखण्यासाठी मतदान करा

## डॉ. शिंदे । मातोश्री वृद्धाश्रमात मतदार जनजागृती



**● नगर । वीरभूमी –**

वाईट, भ्रष्ट व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकप्रतिनिधींचा संसदेतला, विधिमंडळातला भरणा रोखायचा असेल तर भारतीय संविधानातून घटनाकारांनी आपल्याला एक भेदक अस्त्र बहाल केलंय ते म्हणजे मतदान! मतदान करणे म्हणजे संविधानाचा सन्मान राखणे होय, असे स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी सांगितले.

विळद येथील मातोश्री वृद्धाश्रमात स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने मतदार जनजागृती करण्यात आली. या वृद्धाश्रमात सुमारे ४५ वृद्ध पुरुष व महिला आहेत. दिलीप चोरडिया या वृद्धाश्रमाचे काम पाहतात. येथील वृद्धांशी स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. शिंदे यांनी संवाद साधला. त्यांनी या ज्येष्ठ पुरुष व महिलांना मतदानाबाबत विचारले असता त्यांनी आम्ही मतदानाला जातो, असे सांगितले.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, राष्ट्रहितासाठी मतदान करायचं.., लोकशाहीचा सन्मानासाठ १०० टक्के करायच मतदान असे सांगून या वृद्धाश्रमातील नागरिकांना मतदान करण्याबाबत सांगितले. यावर या नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सांगितले की, आम्ही मतदानाला जातोच. आणि मतदानही करतो. वृद्धाश्रमात येऊन मतदानाबाबत जागृती केल्याबद्दल व संवाद साधल्याबद्दल डॉ. उद्धव शिंदे यांचे आभार मानले.

## श्री मार्कंडेय मंदिर देवस्थानच्या जीर्णोद्धाराला विरोध नाही : अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम

**● नगर । वीरभूमी –**

गांधी मैदान येथील श्री मार्कंडेय मंदिर येथे बेकायदेशीर लोकांकडून स्वयंघोषित ट्रस्टी यांच्यामार्फत जीर्णोद्धार करण्याचे ठरले आहे मात्र या ठिकाणी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची मार्कंडेय शाळा असून समन्वयाने प्रश्न मार्गी लागावा यासाठी मंदिर जीर्णोद्धाराचे समन्वयक श्रीकांत छिंदम व मुख्याध्यापक संदीप छिंदम यांच्या उपस्थितीत समाजाची बैठक संपन्न झाली व शाळेला जागा द्यावी व बांधकाम करताना मंदिर व शाळेच्या बांधकामाचे प्लॅन एकत्र मंजुरीसाठी पाठवण्यात यावे आणि एकत्र बांधकाम सुरू करावे, तसेच देवस्थान व शाळा यांच्यात बांधकामाबाबत करार करण्यात यावा, असे ठरले असताना हा प्रश्न मार्गी लागावा. यासाठी पद्मशाली समाजाच्या अनेक वेळा बैठका संपन्न झाल्या. मात्र मूळ प्रश्न बाजूला ठेवून समाजाची दिशाभूल करण्याचे काम करण्यात येत असून पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचा श्री मार्कंडेय मंदिर देवस्थानच्या जीर्णोद्धाराला विरोध नसून बेकायदेशीर स्वयंघोषित ट्रस्टला विरोध आहे अशी माहिती पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम यांनी दिली. गांधी मैदान येथील श्री मार्कडेय मंदिराबाबत पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाची बैठक संपन्न झाली. यात अध्यक्ष बाळकृष्ण सिद्धम यांनी माहिती दिली यावेळी सचिव डॉ. रत्ना बल्लाळ, शरद क्यादर, राजेंद्र म्याना, शंकर सामलेटी, मुख्याध्यापक संदीप छिंदम आदी उपस्थित होते.

शरद क्यादर म्हणाले की, श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट या संस्थेवर आज अखेर कोणीही अधिकृत ट्रस्टी व पदाधिकारी नाहीत श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान ट्रस्ट यांच्याबद्दल अर्ज उप धर्मादाय आयुक्त अहमदनगर यांनी कायदेशीर फेटाळला आहे, असे असताना पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाच्या विरोधात काम करणारे काही लोक व विरोधी गटातील काही विघ्नसंतोषी लोक हे एकत्र येत त्यांनी बनावट निवडणूक घेतल्याची कागदपत्रे तयार करून तसा अर्ज सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयात दाखल केलेला आहे. त्या अर्जावर हरकत घेतलेली आहे, असे असतानाही आम्हाला असे समजते की काही स्वयंघोषित विश्वस्त यांनी विघ्नसंतोषी लोकांना हाताशी धरून चुकून धर्मदाय आयुक्त यांच्या परिशिष्ट १ वर नाव असल्याचा गैरफायदा घेऊन एका ८५ वर्षीय वृद्ध इसमाची फसवणूक करून महापालिकेच्या बांधकाम परवानगी अर्जावर सही घेऊन तसेच खोटे कागदपत्रे सादर करून आयुक्त यांच्याकडून बांधकाम परवानगी मिळवली.

# राजूर परिसरात बीएसएनएलची रेंज गायब

**● अकोले । वीरभूमी –**

कृषी, शिक्षण, बँका आदी सर्वच कामे ऑनलाईन झालेले असताना सातत्याने नेट गायब होत असलेली बीएसएनएलची नेटवर्किंग सेवा राजूर करांसाठी डोकेदुखी बनली आहे.

नेट वर्किंग स्पर्धा असतानाही राजूर मध्ये बीएसएनएलच्या ग्राहकांची मोठी संख्या आहे. शासकीय कार्यालये, बँका, सेतू, शाळा, महाविद्यालय, पोलीस ठाणे आदी ठिकाणीही बीएसएनएल ऑपटीक फायबर कनेक्शन आहेत.

राजूर हे परिसरातील सुमारे शंभर हून अधिक गावांचे मध्यवर्ती ठिकाण आहे.त्यामुळे परिसरातील अनेक नागरिक, शेतकरी, शालेय विद्यार्थी आपली ऑनलाईन तसेच बँकेची कामे करण्यासाठी पदर मोड करत राजूर मध्ये येत असतात. मात्र अनेकदा राजूर मधील ही नेटवर्किंग सेवा विस्कळित झालेली असल्याने साईट बंद असतात त्यामुळे ग्राहकांना हेलपाटे मारावे लागत आहे.

सध्या वरिष्ठ महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत मात्र नेटवर्क गायब झाल्यामुळे



व्यवस्थापना बरोबरच विद्यार्थ्यांनीही याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

मागील चार दिवसांपासून बँकांचे व्यवहार सुद्धा विस्कळित झाले आहेत. त्यामुळे सुमारे चाळीस किलोमीटर अंतरावरुन येणाऱ्या नागरिकांना आपले आर्थिक व्यवहार करण्यासाठी अडथळे निर्माण होत आहेत. अनेकदा या कार्यालयाकडे तक्रारी करूनही फक्त उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. त्यामुळे नाईलाजास्तव ग्राहकांना खासगी कंपन्यांच्या नेटवर्किंग वळावे लागणार काय? अशी चर्चा जोर धरू लागली आहे.

## सारडा महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा परितोषिक समारंभ उत्साहात

**● नगर । वीरभूमी –**

पेमराज सारडा महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक समारंभात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर विविध स्पर्धांमध्ये चमकलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक होते. यावेळी प्रमुख अतिथी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व अंबरनाथ येथील कॉलेजच्या क्रीडा संचालीका शोभा पालवे व पुण्याच्या सेंट जोसेफ स्कूलच्या क्रीडा शिक्षिका राणी तागड यांच्या हस्ते खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष अ‍ॅड.अनंत फडणीस, महाविद्यालयाचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी, रजित श्रीगोड, रवींद्र गुलाटी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित, महाविद्यालयाचे वरिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय धोपावकर व कनिष्ठ क्रीडा विभाग प्रमुख प्रा. संजय साठे, उपप्राचार्य मंगला भोसले, क्रीडा मार्गदर्शक प्रा.साईनाथ थोरात, प्रा.अक्षय कर्डिले आदींसह महाविद्यालयातील विविध क्रीडाप्रकारात यशस्वी झालेले सुमारे ८०० खेळाडू विद्यार्थी, प्राध्यापक व पालक उपस्थित होते. या समारंभात यावेळी आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये यशस्वी झालेल्या खेळाडूंना शिष्यवृत्ती, राष्ट्रीय स्तरावर विजेत्यांना ब्लेझर, ट्रकसूट, स्पोर्ट्स शूज व मोमेंटो देवून सन्मानित आले. प्रा.शिरीष मोडक यांनी खेळाडूंचे कौतुक करताना सांगितले की, खेळाडूंनी खूप मेहनत घेवून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळांमध्ये मोठे प्राविण्य मिळवत महाविद्यालयाचे देश व परदेशात नावलौकिक वाढवले आहे. हे सर्व खेळाडू महाविद्यालयाचे भूषण हाहेत. हिंद सेवा मंडळ व सारडा महाविद्यालयास सर्वांचा अभिमान आहे. सुयोग वाघ हा लवकरच ग्रांडमास्टर होणार आहे.

# लहुजी सेना महायुतीच्या पाठीशी

## प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांची माहिती । खा. सुजय विखेंच्या विजयाची जबाबदारी स्विकारली

**● नगर । वीरभूमी –**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाचा खरा सन्मान भारतीय जनता पक्षाच्या सरकारमध्येच झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजातील उपेक्षित समाजाला न्याय देणाऱ्या योजना सुरु करुन वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे काम केले आहे. त्यामुळेच लहुजी सेनेचे सर्व कार्यकर्ते महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रचार यंत्रणेत काम करत असल्याची माहीती लहुजी सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुशील शिंदे तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

नगर येथे महायुतीचे उमदेवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ खंदारे यांनी विविध भागांमध्ये दौरा करुन, मतदारांशी



संवाद साधला. त्यानंतर निवडणूक कार्यालयात पत्रकारांशी बोलताना त्यांनी लहुजी सेनेची भूमिका स्पष्ट केली. महायुतीच्या उमेदवाराला लहुजी सेनेचे पुर्ण समर्थन असून, महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांना विजयी करण्यासाठी लहुजी सेनेने सुध्दा जबाबदारी स्विकारली असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्या काँग्रेस पक्षाने यापुर्वी ७० ते ८० वेळा घटनेमध्ये बदल केला, त्यामुळे भाजपावर आरोप करण्याचा त्यांना कोणताही आधिकार नाही. संविधानाचा खरा सन्मान हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळातच होवू शकला असे स्पष्ट करुन, लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निवासस्थाला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा देण्याचा निर्णय, इंदु मिल येथील डॉ. आंबेडकरांचे स्मारक तसेच वस्ताद लहुजींच्या स्मारका करीता ५ गुंठे जमीन आणि निधीची उपलब्धता करुन देण्याचा महत्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यामुळेच लहुजी सेनेने महायुती सरकारच्या निर्णयांचे स्वागत केले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लहुजी सेनेचे सर्व कार्यकर्ते सक्रीयेपणे प्रचारात सहभागी झाले असून, युतीचे सर्व उमेदवार विजयी करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी सांगितले.